मफुकृवि ई वार्ता
मे २०२१

वर्ष :१, अंक क्रं. : ५, मे २०२१   महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## केंद्रीय राज्यमंत्री ना. श्री संजय धोत्रे यांची कृषि विद्यापीठास भेट





**दि. १४ मे, २०२१.** केंद्रिय शिक्षण, दूरसंचार आणि इलेक्ट्रॉनिक्स  व माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री मा.ना. श्री. संजय धोत्रे यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ पी.जी. पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. कुलगुरू डॉ पी.जी.पाटील यांनी त्यांना महात्मा फुले कृषी विद्यापीठाने कृषि क्षेत्रात आणि  शेतकऱ्यांसाठी केलेल्या योगदानाची माहिती दिली. यावेळी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, संशोधन  आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांनी विद्यापीठाच्या शिक्षण, संशोधन आणि विस्तार संदर्भात माहिती दिली. यावेळी मंत्रीमहोदयांनी पदव्यत्तर महाविद्यालयातील मुलींच्या वसतिगृहाच्या सोलर युनिटला आणि आंतरविद्या जलसिंचन विभागाच्या सिंचन उद्यानास भेट दिली. याच बरोबर कास्ट प्रकल्पाच्या ड्रोन प्रात्यक्षिकाची पाहणी केली व या उपक्रमाचे कौतुक केले. मा.ना. श्री. धोत्रे आणि मा. कुलगुरुंच्या शुभहस्ते वृक्षारोपन करण्यात आहे.  या प्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ महानंद माने, सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, नियंत्रक श्री विजय कोते, विद्यापीठ अभियंता श्री मिलिंद ढोके उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ५, मे २०२१

## राज्याचे मा. जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री यांची शेंडा पार्कला भेट



**दि. ३१ मे, २०२१.** महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री मा.ना. श्री. जयंत पाटील यांनी नुकतीच विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर येथे भेट दिली. यावेळी सहयोगी संशोधन संचालक डॉ. उत्तम होले यांनी त्यांचे स्वागत केले. डॉ. होले यांनी त्यांना विभागीय कृषि संशोधन केंद्राच्या संशोधन उपलब्धीबद्दल सविस्तर माहिती दिली. ना. पाटील यांनी यावेळी संशोधन केंद्राच्या योगदानाबद्दल समाधान व्यक्त केले. याप्रसंगी केंद्राचे शास्त्रज्ञ उपस्थित होते.

## खरीप हंगामाची विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समिती बैठक संपन्न






**दि. ३१ मे, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेले वाण व प्रसारीत केलेल्या शिफारशी राज्यातच नव्हे तर देशातील शेतकऱ्यांना फायदेशीर आहेत. विद्यापीठाने विकसीत केलेल्या आणि अभ्यासातून असे दिसून आले की केवळ आठ पिकांच्या वाणांमुळे शेतकऱ्यांना आत्तापर्यंत एक लाख कोटीचे उत्पन्न मिळाले आहे व दरवर्षी विद्यापीठ विकसीत वाणांपासून सहा हजार कोटीचे उत्पन्न शेतकऱ्यांना मिळत आहे. या कोरोनाच्या काळात देखील कृषि विद्यापीठे, कृषि विभाग आणि महाबीज यांनी भरीव काम केलेले आहे. सन २०२०–२१ ला अंदाजे ३०५ दशलक्ष मे.टन अन्नधान्याचे उत्पादन होईल असा प्राथमिक अंदाज आहे. या तिन्ही विभागांच्या एकत्रीत कामगिरीमुळे अन्नधान्याचे उत्पादन वाढून शेतकऱ्यांना फायदा होत असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले.

वर्ष :१, अंक क्रं. : ५, मे २०२१ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने खरीप हंगामासाठीची विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समिती बैठकीचे उद्‌घाटन संपन्न झाले. या प्रसंगी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील बोलत होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन राज्याचे कृषि आयुक्त श्री. धीरज कुमार उपस्थित होते. याप्रसंगी महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक श्री. राहुल रेखावाल, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे, कृषि परिषदेचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. विठ्ठल शिर्के उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शन करतांना कृषि आयुक्त श्री. धीरज कुमार म्हणाले यावर्षी पावसाचा चांगला अनुमान आहे. या पावसाचा फायदा घेण्यासाठी कृषि विज्ञान व तंत्रज्ञान याची जोड देणे गरजेचे आहे. यावेळी महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक श्री. राहुल रेखावाल म्हणाले की आंतर संस्थात्मक सहभाग यावर भर दिल्यामुळे खरीप हंगामातील विविध पिकांच्या बिजोत्पादनात वाढ होऊन त्याचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे. याप्रसंगी संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने सन २०२० मध्ये प्रसारीत केलेले वाण व शिफारशी आणि विस्तार उपक्रमांचे सादरीकरण केले.

यावेळी डॉ. मिलिंद देशमुख यांनी खरीप सोयाबीन पीक उत्पादन तंत्रज्ञान, डॉ. पंकज पाटील यांनी खरीप पिकांचे किड व रोग व्यवस्थापन, श्री. अजय कुचे यांनी खरीप हंगामाकरीता बियाणे उपलब्धता या विषयावर मार्गदर्शन केले. याचबरोबर पुणेचे विभागीय कृषि सहसंचालक श्री. बसवराज बिराजदार, कोल्हापूरचे विभागीय कृषि सहसंचालक श्री. उमेश पाटील, नाशिकचे विभागीय कृषि सहसंचालक श्री. संजीव पडवळ यांनी विभागीय खरीप अहवाल व विद्यापीठ शिफारशी प्रत्याभरणाचे सादरीकरण केले. यावेळी कृषि अधिकारी व शास्त्रज्ञ यांचा कृषि तंत्रज्ञान प्रत्याभरणावर सुसंवाद झाला. या बैठकीत स्वागत व प्रास्ताविक प्रसारण केंद्राचे प्रमुख डॉ. पंडित खर्डे यांनी केले. या बैठकीला कृषि विभागाचे संचालक, सहयोगी अधिष्ठाता, कृषि सहसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी, विद्यापीठाचे शास्त्रज्ञ, कृषि विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख तर आभार डॉ. गोकुळ वामन यांनी मानले.

## काटेकोर सिंचनासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर या विषयावर ऑनलाईन प्रशिक्षणाचे आयोजन



**दि. १८ मे, २०२१.** वाढत्या लोकसंख्येमुळे अन्नधान्याची मागणी पूर्ण करण्यासाठी शेतीचे महत्व अधोरेखित झाले आहे. विद्यापीठाने विकसीत केलेले तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत प्रसारित झाल्यास शेतीची उत्पादनक्षमता वाढेल असे

प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान प्रकल्पांतर्गत काटेकोर सिंचनासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर या प्रशिक्षण वर्गाच्या ऑनलाईन समारोपप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नवी दिल्ली पुसाचे आंतरराष्ट्रीय जलव्यवस्थापन प्रमुख संशोधक डॉ. अशोक सिक्का उपस्थित होते. या आधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, दापोलीचे डॉ. राजेश थोरात, प्रकल्पाचे प्रमुख संशोधक आणि प्रशिक्षणाचे निमंत्रक डॉ. सुनिल गोरंटीवार, डॉ. मुकुंद शिंदे, डॉ. सचिन डिंगरे तसेच विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

यांप्रसंगी कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील पुढे म्हणाले की, तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आजादी दूँगा या नेताजी सुभाषचंद्र यांच्या आवाहनाप्रमाणे आता तुम मुझे जल दो, मैं तुम्हे जीवन दूँगा असे म्हणण्यासारखी परिस्थिती निर्माण झालेली आहे. यावेळी डॉ. अशोक सिक्का म्हणाले की शेतीमध्ये पाणी हा महत्वाचा घटक असला तरी शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी पीक, माती, खत आणि पोषक व्यवस्थापनासह त्याचे एकात्मीकरण तितकेच महत्वाचे आहे. देशात सिंचनाची कार्यक्षमता कमी आहे, म्हणुनच आपल्याला पाण्याचा वापर, त्याची उत्पादकता आणि क्षमता वाढविण्यासाठी विविध मार्ग अवलंबिण्याची गरज आहे.

या प्रशिक्षणास सात राज्यांतून १५३ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. या ऑनलाईन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मंगल पाटील यांनी तर आभार डॉ. मुकुंद शिंदे यांनी मानले. या एकवीस दिवस प्रशिक्षणाच्या यशस्वितेसाठी डॉ. सचिन डिंगरे, डॉ. प्रज्ञा जाधव व डॉ. मंगल पाटील यांनी विशेष प्रयत्न केले.

## कृषि विज्ञान केंद्रांच्या शास्त्रीय सल्लागार समिती बैठका संपन्न



**दि. २५ ते २८ मे, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या बोरगाव (जि. सातारा), धुळे, ममुराबाद (जि. जळगाव) आणि मोहोळ (जि. सोलापूर) येथील कृषि विज्ञान केंद्रांच्या शास्त्रीय सल्लागार समिती बैठका आयोजीत करण्यात आल्या होत्या. या सर्व बैठकींच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. शेतकऱ्यांची आर्थिक सुबत्ता वाढविण्यासाठी विद्यापीठ व जिल्हास्तरीय कृषि सलंग्न विभागांनी एकत्रित काम करणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी

व्यक्त केले. तसेच शेतकऱ्यांची गरज लक्षात घेऊन विद्यापीठाचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे व कृषि विज्ञान केंद्राच्या उपक्रमांमध्ये महिला शेतकऱ्यांना जास्तीत जास्त सहभागी करुन घ्यावे व उत्पन्न वाढीसाठी त्यांच्यापर्यंत विविध योजनेची माहिती करुन द्यावी असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले.

बोरगांव येथील कृषि विज्ञान केंद्राची शास्त्रीय सल्लागार समिती बैठक ऑनलाईन पध्दतीने संपन्न झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरुन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील बोलत होते. यावेळी संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख व आयसीएआर–अटारी, पुणेचे संचालक डॉ. लाखन सिंग प्रामुख्याने उपस्थित होते. या प्रसंगी राष्ट्रीय पुष्प संचालनालय, पुणे यांचे संचालक, डॉ. प्रसाद व राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे यांचे संचालक डॉ. सोमकुवर तसेच सातारा जिल्हयातील कृषि विभाग, मत्स विभाग, रेशीम, नाबार्ड, जिल्हा मध्यवर्ती बँक, ऊस संशोधन केंद्र, पाडेगांव, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अन्न सुरक्षा अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, कराड, राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प, कोल्हापुर व प्रगतशिल शेतकरी उपस्थित होते.

प्रा. मोहन शिर्के, कार्यक्रम समन्वयक, कृषी विज्ञान केंद्र बोरगाव, यांनी वार्षिक कृति आराखडा व मागील वर्षी झालेल्या उल्लेखनीय कामांची सादरीकरण केले. कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, डॉ. हेमंत बाहेती आणि डॉ. तानाजी वळकुंडे यांनी अनुक्रमे धुळे, ममुराबाद आणि मोहोळ कृषि विज्ञान केंद्रांचे सादरीकरण केले.

## कृषि महाविद्यालय, धुळे येथे दूध, फळे आणि भाजीपाला मूल्यवर्धित प्रक्रियेवर पाच दिवस राज्यस्तरीय ऑनलाइन प्रशिक्षण संपन्न




**दि. १९–२३ मे २०२१.** शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी ग्रामीण भागात मूल्यवर्धित प्रक्रिया उद्योग उभारणी करणे गरजेचे असून आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करण्यास मदत होईल तसेच या क्षेत्रात ग्रामीण भागातील तरुणांना आकर्षित करून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी प्रक्रिया उद्योग महत्वाचा घटक ठरेल असे प्रतिपादन कुलगुरू डॉ.पी.जी.पाटील यांनी आपल्या

मार्गदर्शनात केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र, धुळे, कृषि महाविद्यालय, धुळे व कृषि तंत्र विद्यालय, धुळे यांचे संयुक्तपणे किसान, पुणे याचे सहकार्याने दूध, फळे आणि भाजीपाला मूल्यवर्धित करण्याच्या प्रक्रियेवरील पाच दिवसांचे ऑनलाइन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी डॉ. लाखन सिंग, संचालक, अटारी पुणे, डॉ. शरद गडाख, संचालक विस्तार शिक्षण हे उपस्थित होते.

प्रास्ताविक सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणि देवकर यांनी पाच दिवसांच्या वेबिनारची माहिती आणि दूध, फळे आणि भाजीपाला मूल्यवर्धित प्रक्रिया महत्त्व सांगून केले. डॉ. लाखन सिंग यांनी सहभागी प्रशिक्षनार्थिनी अधिकाधिक नफा मिळविण्यासाठी बाजारपेठेशी जोडले जाणारे विविध उत्पादक शेती प्रणालींचे मॉडेल, अधिक उत्पन्न देणारे उत्पादक उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. डॉ.शरद गडाख यांनी कृषि विज्ञान केंद्र, धुळे यांच्या उपक्रमांचे कौतुक केले. एकात्मिक शेती प्रणाली शेतकऱ्याची आर्थिक वाढ कशी टिकवून ठेवते याबद्दल त्यांनी उपस्थित प्रशिक्षानार्थीना मार्गदर्शन केले व एकात्मिक शेती प्रणाली आत्मसात करण्याचे आव्हान केले. डॉ. दिनेश नांद्रे, कार्यक्रम समन्वयक, केव्हीके, धुळे यांनी सर्व सहभागींना फळ व भाजीपाला क्षेत्रातील महत्त्व, व्याप्ती आणि संधी याविषयी माहिती दिली. डॉ. राहुल देसले, प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, धुळे यांनी दुग्धव्यवसाय प्रक्रियेचे महत्त्व आणि दुग्ध उद्योगातील संधींबद्दल सविस्तर माहिती उपस्थितांना करून दिली. या प्रशिक्षणात शास्त्रज्ञांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. त्यासोबतच सदर प्रशिक्षणामध्ये तज्ञ मार्गदर्शकांचे विविध विषयांवर मार्गदर्शन मिळाले. सदर प्रशिक्षणाचे सूत्रसंचालन आणि समन्वयक म्हणून डॉ धनराज चौधरी काम पहिले. या प्रशिक्षणामध्ये ग्रामीण युवक, शेतकरी, महिला, बचत गट, एफपीओ इत्यादी २०० पेक्षा जास्त प्रशिनार्थिनी सहभाग नोंदवला.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या आंब्याची गोडी वाढली–विक्रीतून मिळाले एक कोटीचे उत्पन्न

**दि. १७ मे, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील आंब्याची गोडी दिवसेंदिवस वाढत आहे. या गोडव्यातूनच विद्यापीठास तब्बल एक कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. मागील चार वर्षातील उत्पन्नाचा हा उच्चांक आहे. बियाणे विभागाने ७० लाख, उद्यानविद्या विभागाने १९ लाख रुपयांच्या आंबाविक्रीची किमया साधली आहे. यावर्षी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. श्रीमंत रणपिसे व त्यांचे सहकारी, बियाणे विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. आनंद सोळंके, डॉ. चंद्रकांत साळुंखे, डॉ. युवराज बालगुडे, प्रक्षेत्रावरील बियाणे विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी फळबागेचे नियोजन केले. झाडांची योग्य काळजी घेत, पाऊस व पाटपाण्याचे योग्य व्यवस्थापन केले. फळधारणेसाठी झाडांची संख्या निश्चित केली, तसेच मोहर लागल्यानंतर दोन महिने झाडांची योग्य काळजी घेतली. विद्यापीठातील बियाणे विभाग व उद्यानविद्या विभागातील कनिष्ठ कर्मचाऱ्यांची कमतरता असतानाही या झाडांची निगा ठेवली. सर्वांच्या प्रयत्नातून उत्पन्नवाढीची किमया साधली. मागील चार–पाच वर्षापासून विद्यापीठाद्वारे ई–निविदा प्रक्रियेतून आंबा बागांचा लिलाव करण्यात येतो. या वर्षी आंबा व्यापाऱ्यांबरोबर ऑनलाईन झूम मीटिंगद्वारे ई–निविदा प्रक्रिया पार पाडली. विद्यापीठाच्या आंब्यांमध्ये प्रामुख्याने केशर, लंगडा, हापूस, तोतापूरी, स्थानिक गावरान वाण, साई सुगंध तसेच वनराज या जातींच्या आंब्यांचा समावेश होते. त्यांना मागणी वाढल्याने उच्चांकी भाव मिळाला आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या उत्पन्नातही घसघशीत भर पडली आहे.

## ऑनलाईन वेबिनारमध्ये मा. कुलगुरुंचे मार्गदर्शन




**दि. २७ मे, २०२१.** नॅनो युरिया हा पीक उत्पादनवाढीसाठीचा नवीन आविष्कार ठरेल असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. नॅनो युरियाचे महत्त्व आणि उपयोग या विषयावरील इफकोने आयोजित केलेल्या ऑनलाईन वेबिनारमध्ये डॉ. पाटील मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी डॉ. रमेश रालिया, महाप्रबंधक, नॅनोटेक्नॉलॉजी, इफको कलोल व संशोधक, सेंट लुईस वॉशिंग्टन विद्यापीठ, अमेरिका, श्री. योगेन्द्र कुमार, विपणन संचालक, इफको, नवी दिल्ली यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले की कृषी क्षेत्रापुढे आज अनेक आव्हाने आहेत. आपल्या देशात सरासरी १३० किलो प्रति हेक्टरी एवढा युरियाचा वापर होत असतो. वर्षभरात सुमारे ५० लाख टन युरियाची आपल्याला आवश्यकता आहे. परंतु, नॅनो युरियामुळे आयातीवरील खर्च कमी करता येईल. याशिवाय युरिया मात्राची परिणामकारकता वाढवून पीक उत्पादनासाठी याची मदत होईल. सुमारे ९४ वेगवेगळ्या पिकांवरील प्रयोग करून आणि अकरा हजार शेतकऱ्यांच्या शेतावर या नॅनो युरियाची प्रात्यक्षीके घेऊन हे उत्पादन तयार करण्यात आले आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि इफको यांच्यातील समन्वयाने नॅनो खत व्यवस्थापनातील तंत्रज्ञान तयार करण्यासाठी मदत होईल अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. पाटील यांनी व्यक्त केली. इफकोचे राज्य विपणन व्यवस्थापक श्री. उदय तिजारे यांनी कार्यक्रमाचे स्वागत केले. श्री. योगेन्द्र कुमार यांनी इफकोचे कृषी क्षेत्रातील योगदान याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. रमेश रालिया यांनी नॅनो युरियाचे महत्त्व आणि उपयोग यावर मार्गदर्शन केले. शेवटी डॉ. एम.एम. पोवार यांनी आभार प्रदर्शन केले. या वेबिनारमध्ये शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता.

मफुकृवि ई वार्ता
मे २०२१

वर्ष :१, अंक क्रं. : ५, मे २०२१     महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम प्रकल्पाच्या ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन





**दि. २८ मे, २०२१.** खरीप पिकांचे नियोजन करतांना उत्पादन वाढीचे सुत्र समजून घ्या. यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर करा, पीक उत्पादन खर्च कमी करा, शेतकऱ्यांनी एकत्र येऊन उत्पादनाचे विपणन करा. या त्रिसुत्रीचा वापर केला तर नक्कीच पीक उत्पादन दुप्पट होऊन उत्पन्न वाढण्यास मदत होइल असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत भारतीय कृषि अनुसंधान परिषद शेतकरी प्रथम कार्यक्रम आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय ऑनलाईन खरीप हंगाम नियोजन प्रशिक्षण व शेती शाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख बोलत होते. यावेळी अटारी पुणेचे संचालक डॉ. लाखन सिंग, आय.सी.ए.आर.–नार्म, हैद्राबादचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. पी. व्यंकटेशन, तज्ञ डॉ. आनंद सोळंके, डॉ. एम.पी. देशमुख, डॉ. नंदकुमार कुटे, भारतीय कृषि अनुसंधान परिषद शेतकरी प्रथम प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे, तालुका कृषि अधिकारी, श्री. महेंद्र ठोकळे, श्री. रायभान गायकवाड उपस्थित होते.

संचालक डॉ. लाखन सिंग मार्गदर्शन करतांना म्हणाले शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत चिंचविहिरे व कणगर या गावांमध्ये एकात्मिक शेती पध्दतीचा प्रसार व अवलंबन योग्य प्रकारे होत आहे. याप्रसंगी प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. पी. व्यंकटेशन म्हणाले शेतकरी बंधूंनी नवाचारांचा वापर करुन उत्पादन व उत्पादकता वाढविणे गरजेचे आहे. यावेळी तालुका कृषि अधिकारी श्री. ठोकळे म्हणाले शेतकऱ्यांनी मृद आरोग्यप्रत्रिकानुसार खतांचा वापर करावा.

याप्रसंगी प्रमुख समन्वयक डॉ. खर्डे यांनी प्रकल्पांतर्गत केलेल्या कामांची थोडक्यात माहिती दिली व प्रास्ताविक केले. यावेळी प्रमुख शास्त्रज्ञ, बियाणे डॉ. आनंद सोळंके यांनी खरीप हंगामातील बियाणे निवड, सोयाबीन पैदासकार डॉ. मिलिंद देशमुख यांनी सोयाबीन उत्पादन तंत्रज्ञान आणि कडधान्य सुधार प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार कुटे यांनी तुर उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सचिन सदाफळ यांनी तर आभार डॉ. भगवान देशमुख यांनी मानले. या प्रशिक्षण कार्यक्रमाला चिंचविहिरे, कणगर, तांभेरे, कानडगाव व पंचक्रोशीतील शेतकरी ऑनलाईन उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी श्री. विजय शेडगे, श्री. किरण मगर आणि श्री. राहुल कोऱ्हाळे यांनी परिश्रम घेतले.

मफुकृवि ई वार्ता
मे २०२१

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ९, मे २०२१

## सेवानिवृत्तीच्या दिवशी मिळाला सेवानिवृत्तीचा आदेश



**दि. ३१ मे, २०२१.** सेवानिवृत्तीनंतर निवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीच्या कागदपत्रांची पुर्तता करण्यास मोठा कालावधी जातो. त्यामुळे निवृत्त कर्मचाऱ्याला मानसीक त्रास होतो. यासाठी येथून पुढे सेवानिवृत्तपुर्ततेचे काम कार्यालय करणार आणि सेवानिवृत्तीच्याच दिवशी सेवानिवृत्तीचा आदेश, रजा रोखीकरणाचा आदेश आणि भविष्य निर्वाह निधीचा आदेश हे तीन्ही आदेश निवृत्तीच्याच दिवशी देण्यात येतील. निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांनी निवृत्तीनंतरदेखील आपला ज्ञानाचा उपयोग शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी करावा. निवृत्त झालेले अधिकारी व कर्मचारी यांनी आपले आरोग्य जपावे असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठात ३१ मे रोजी ५२ अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले. यावेळी या सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीचा आदेश देण्याच्या कार्यक्रमात अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, कुलसचिव डॉ. महानंद माने, नियंत्रक श्री. विजय कोते उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठात ३१ मे रोजी १२ अधिकारी व ४० कर्मचारी सेवानिवृत्त झाले. विद्यापीठाच्या इतिहासामध्ये प्रथम सेवानिवृत्तीच्या दिवशी सेवानिवृत्तीचा आदेश, रजा रोखीकरणाचा आदेश आणि भविष्य निर्वाह निधीचा आदेश सेवानिवृत्तीच्या दिवशी निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सामाजीक अंतर पाळून प्रातिनिधीक स्वरुपात आठ अधिकारी व कर्मचाऱ्यांना हे आदेश देण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत आणि सूत्रसंचालन कुलसचिव डॉ. महानंद माने यांनी केले आणि आभार नियंत्रक श्री. विजय कोते यांनी मानले. या कार्यक्रमाला कोव्हीड-१९ परिस्थितीमुळे मोजके कर्मचारी सामाजिक अंतर पाळुन उपस्थित होते.

## शेतकऱ्याना मिळतोय व्हॉट्सअपव्दारे हवामान अंदाज व हवामान आधारित कृषि सल्ला

**दि. २६ मे, २०२१.** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत ग्रामीण कृषी हवामान सेवा प्रकल्प कार्यरत आहे. या प्रकल्पाअंतर्गत आठवड्याच्या प्रत्येक मंगळवारी व शुक्रवारी तालुका निहाय हवामान आधारित कृषी सल्ला दिला जातो. मागील वर्षापासून हवामानाची माहिती थेट शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्यासाठी हवामान आधारित कृषी सल्ला व्हॉट्सअँपद्वारे देण्यात येतो, अशी माहिती महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या ग्रामीण कृषी हवामान सेवा प्रकल्पाच्या कृषी विद्या विभागाचे प्रमुख डॉ. आनंद सोळंके यांनी दिली. सध्या दिल्या जात असलेल्या हवामान आधारित कृषी सल्ल्यामध्ये मागील सात दिवसांच्या हवामानाचे आकडेवारी दिली जाते. तसेच पुढील पाच दिवसांचा सविस्तर हवामानाचा अंदाज आणि हवामान आधारीत पीकनिहाय कृषी सल्ला देण्यात येतो. दैनंदिन शेतीचे नियोजन करताना सदरील हवामान आधारित कृषी सल्ला शेतकऱ्यांना उपयुक्त ठरतो. त्यामुळे हवामान आधारित कृषी सल्ला मिळविण्याकरिता शेतकऱ्यांनी ८४२१०१२१८५ ह्या क्रमांकावर फक्त आपल्या तालुक्याचे नावे व्हाट्सअँपद्वारे मेसेज करावा. तदनंतर त्या शेतकऱ्यास सदरील तालुक्याच्या ग्रुपमध्ये समाविष्ठ करून त्यांना सदरील तालुक्याकरिताचा हवामान आधारित कृषी सल्ला नियमित प्राप्त होईल.

## डॉ. मिलिंद अहिरे यांची विस्तार शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीय सोसायटीच्या सहसचिवपदी नेमणूक



**दि. २५ मे, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या पद्य्युतर महाविद्यालयातील  कृषि विस्तार व संज्ञापन विभाग प्रमुख आणि हळगाव कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे यांची नागपूर येथील विस्तार शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीय सोसायटीच्या सहसचिवपदी नेमणूक करण्यात आली आहे. डॉ. अहिरे हे कृषि विस्तार व संज्ञापन विभाग प्रमुख असून त्यांच्याकडे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हळगावचा सहयोगी अधिष्ठाताचा अतिरीक्त पदभार आहे. डॉ. अहिरे यांनी या अगोदर धुळे कृषि महाविद्यालयाचा सहयोगी अधिष्ठाताचा पदभार सक्षमपणे सांभाळला आहे. कृषि विद्यापीठात त्यांना विविध पदांचा २५ वर्षाचा अनुभव असुन त्यांनी भाकृअप समन्वय अधिकारी या पदाचा अतिरिक्त पदभार आणि विद्यापीठाच्या नियोजन, मुल्यमापन आणि देखरेख प्रकल्पाचे प्रमुख म्हणुन सक्षमपणे काम पाहिले आहे. इंडियन सोसायटी ऑफ एक्स्टेन्शन एज्युकेशन, नवी दिल्ली, पश्चिम विभागाचे उपाध्यक्ष म्हणून काम करीत आहेत.महाराष्ट्र सोसायटी ऑफ एक्सटेन्शन एजुकेशनच्या सहसचिवपदी त्यांची नेमणुक असुन सोसायटी ऑफ कृषि विज्ञानच्या पश्चिम विभागाचे समन्वयक म्हणुन ते काम बघत आहे. त्यांना राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आलेले आहे. या नवीन नेमणुकीमुळे डॉ. अहिरे यांची महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी   वर्ष :१, अंक क्रं. : ५, मे २०२१

## जून महिन्यातील कामांचा तपशील

### बागायती कापूस

- बीटी कापूस लागवडीनंतर ३० दिवसांनी नत्र खताचा दुसरा हप्ता (५० किलो नत्र प्रति हेक्टर) देवून पाणी द्यावे.
- बिगर बीटी कापूस लागवडीनंतर ३० दिवसांनी नत्र खताचा दुसरा हप्ता (४० किलो नत्र प्रति हेक्टर) देवून पाणी द्यावे.
- मावा, तुडतुडे इत्यादी रस शोषणाऱ्या किडीचा अधिक नुकसान पातळीपेक्षा जास्त प्रादुर्भाव दिसून आल्यास ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. लेडीबर्ड बिटल, क्रायसोपा या सारख्या मित्र किडींचे संवर्धन करावे.
- बीटी कपाशीमध्ये गुलाबी बोंड अळीच्या सर्वेक्षणासाठी शेतात हेक्टरी ५ कामगंध सापळे उभारावेत व त्यातील पेक्टीनो ल्यूर दर २१ दिवसांनी बदलावे.
- शेतामध्ये तण दिसून आल्यास ३० ते ३५ दिवसांनी एक खुरपणी करावी.

### ऊस

- आडसाली उसाच्या लागणपूर्व तयारीच्या दृष्टीने जमिनीची निवड, पूर्व मशागत, रान बांधणी, ऊस जाती, बेणे उपलब्धता सेंद्रीय आणि रासायनिक खत पुरवठा, तणनाशके व आंतरपिके याबाबत मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगांव येथील शास्त्रज्ञांनी सल्ला मसलत करुन यासाठी तजवीज करुन ठेवावी.
- पूर्वहंगामी आणि आडसाली ऊस जोदार वाढीच्या अवस्थेत असून, जमिनीतील ओल, पाऊसमान पाहून उपलब्धतेनुसार नियमित पाणी पुरवठा करावा.
- उशीरा लागण झालेल्या सुरु उसास मोठया बांधणीच्या वेळी १०० किलो नत्र (२१७ किला युरिया), ५५ किलो स्फुरद (३४४ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ५५ किलो पालाश (९२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) अशी प्रती हेक्टरी रासायनिक खतांची मात्रा द्यावी.
- उसास युरियाची मात्रा देताना निंबोळी पेंडीची बारीक भुकटी एक किलो व सहा किलो युरिया असे प्रमाण ठेवावे. खोडवा उसास (खोडवा ठेवल्यानंतर १३५ दिवसांनी) पहारीच्या सहाय्याने खतांचा दूसरा हप्ता म्हणजेच १२५ किलो नत्र (२७२ किलो युरिया), ५५ किलो स्फुरद (३४४ किलो सिंगल फॉस्फेट) आणि ५५ किलो पालाश (९२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) अशी प्रति हेक्टरी रासायनिक खतांची मात्रा द्यावी.
- पट्टा पध्दत आणि सूक्ष्म जलसिंचन पध्दत यांचा अवलंब केल्यास उसावरील पाण्याचा ताण कमी करता येईल.
- ठिबक सिंचनाची सोय असल्यास २१ ते २६ आठवड्यांपर्यंतच्या सुरू व खोडवा उसाला वाढीच्या अवस्थेनुसार एकरी ४ किलो पांढरे म्युरेट ऑफ पोटॅश प्रति आठवडा ठिबक सिंचन प्रणाली मधून द्यावीत.

### कडधान्य पिके

#### मूग आणि उडिद

- दुसऱ्या पंधरवाड्यात चांगला पाऊस झाल्यावर वापश्यावर बीजप्रकिया करुन पेरणी करावी. (प्रति किलो बियाणास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा व यानंतर २५ ग्रॅम रायझोबियम जीवाणूसंवर्धक).
- शिफारशीत ख़त मात्रा ( २० :४० :०० / हेक्टर ) पेरणीवेळी द्यावी.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्र. : ९, मे २०२१

## तूर

- दुसऱ्या पंधरवाड्यात चांगला पाऊस झाल्यावर बीजप्रकिया (२ ग्रॅम थायरम + २ ग्रॅम बाविस्टीन किंवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा / किलो बियाणे व यानंतर २५० ग्रॅम रायझोबियम जीवाणूसंवर्धक/ १० किलो बियाणे ) करुन वापश्यावर पेरणी करावी. शक्यतो ७ जून ते ७ जुलै पर्यंत पेरणी करावी.
- शिफारशीत ख़त मात्रा पेरणीवेळी द्यावी.
- तणनाशकाचा वापर करावयाचा असल्यास पेरणीनंतर लगेच पुरेसा ओलावा असताना उगवणीपूर्व तणनाशक पेंडिमेथॉलीन फवारावे.
- पेरणीनंतर १० दिवसांनी नांग्या भराव्यात.

## भात

### * रोपवाटीका नियोजन

### अ) सुधारीत जाती

| पद्धत | बियाणे किलो प्रति हेक्टरी |
|---|---|
| पुर्नलागवड | ३५–४० |
| पेरणी | ७५ |
| टोकण | (१५–२५ X १५–२५)सें.मी. २५–३० |

### ब) संकरीत जातीसाठी प्रति हेक्टरी २० किलो बियाणे वापरावे

### बिजप्रक्रिया

पेरणीपूर्वी बियाणास २.५ ग्रॅम प्रति किलोग्रॅम याप्रमाणे कार्बेन्डाझिम किंवा थायरम/कॅप्टन बुरशीनाशक चोळावे. त्यानंतर ॲझोटोबॅक्टर, स्फुरद विरघळणारे जीवाणू व ॲझोस्पिरीलिअम या जीवाणू खतांची २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाण्यास बीजप्रक्रीया करावी.

### पेरणी कालावधी व पेरणी अंतर

अ) पुर्नलागवड भात : १ मीटर रुंदी, १५ सें.मी. उंची व सोईनुसार लांबी ठेवून गादी वाफ्यावर खरीप हंगामामध्ये १ जून ते ३० जून पर्यंत पेरणी करावी.

साधारणतः १० गुंठ्याची रोपवाटीका १ हेक्टर लागवडीसाठी पुरेशी ठरते. रोपवाटीकेसाठी २५० ग्रॅम शेणखत, ५०० ग्रॅम नत्र, ४०० ग्रॅम स्फुरद, ५०० ग्रॅम पालाश प्रति गुंठा द्यावे. पेरणी ओळीत करावी. पेरणीनंतर १५ दिवसांनी ५०० ग्रॅम नत्र प्रति गुंठा रोपे वाढीसाठी द्यावे.

ब) पेरभात : भात बियाणे २२.५ किंवा ३० सें.मी. अंतर ठेवून पेरणी करावी.

क) टोकण पद्धत : भात बियाणे ३० X १५ सें.मी. किंवा २२.५ X २२.५ सें.मी. अंतरावर टोकण करावे.

-

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ५, मे २०२१

## तण नियंत्रण

- **रोपवाटीका :**

  रोपवाटीकेतील तण नियंत्रणासाठी १५ मि.ली. ऑक्झीफ्लुरोफेन २३.५ टक्के ई.सी. प्रती १० लिटर पाण्यात पेरणीनंतर दोन ते तीन दिवसात फवारावे अथवा ब्युटाक्लोर ५० ई.सी. १.५ किलो क्रियाशील घटक प्रती हेक्टरी अथवा ॲनिलोगोर्ड ३० ई.सी. ३ किलो क्रियाशील घटक प्रति हेक्टरी फवारण्यात यावे.

- **पेरभात व टोकण पद्धतीचा भात**

  पेरभात व टोकण पद्धतीच्या भात शेतीमध्ये पेरणीनंतरची कुळवणीमुळे तण नियंत्रण होते परंतु, रासायनिक पद्धतीने तणनियंत्रण करण्यासाठी तण उगवणीपूर्वी पेरणीनंतर लगेचच ६४० मि.ली. ऑक्झीफ्लुरोफेन २३.५ टक्के ई.सी. ०.१५० किलो क्रियाशील घटक प्रति हेक्टरी दोन ते तीन दिवसांत फवारावे व त्यानंतर तण उगवल्यानंतर २५ दिवसांच्या आत २० ग्रॅम मेटसल्फुरॉन मिथाईल १० टक्के + क्लोरीम्युरॉन इथाईल १० टक्के तयार मिश्रण ०.००४ किलो क्रियाशील घटक प्रति हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे अथवा पेंडॅमिथीलीन ३० टक्के ई.सी. ०.७५ क्रियाशील घटक प्रति हेक्टरी दोन ते तीन दिवसांत फवारावे व त्यानंतर तण उगवल्यानंतर २५ दिवसांच्या आत २–४–डी ०.५ किलो क्रियाशील घटक प्रति हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे व ४० दिवसांनी एक बेनणी करावी.

## नाचणी

- **रोपवाटीका**

  गादीवाफा साधारणतः १ ते १.५ मी. रुंद आणि ८ ते १० सें.मी. उंच व उतारानुसार लांबी ठेवून गादीवाफे जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात तयार करावेत. दर चौ.मी. क्षेत्रावर ३ किलो याप्रमाणे शेणखताचा थर द्यावा. आणि प्रति गुंठ्यास १ किलो युरिया द्यावा. ७ ते ८ सें.मी. अंतरावर ओळीत १ ते २ सें.मी. खोल बियाणे पेरून हाताने झाकावे. पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रति गुंठा १ किलो युरिया द्यावा. एक एकर क्षेत्र रोप पुनर्लागणीकरीता २ – ३ गुंठे क्षेत्रावरील रोपवाटीका पुरेशी होते.

## सुधारीत वाण

- फुले नाचणी, दापोली–१, दापोली सफेद, दापोली–२, फुले कासारी

## बाजरी

- शिफारशीप्रमाणे रासायनिक खताची मात्रा देऊन तसेच जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करून पिकाच्या अंतरानुसार पेरणी करावी. ॲट्राझीन तणनाशकाची १.० कि.प्रती हेक्टरी पेरणीनंतर ५०० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. पेरणी नंतर १० दिवसांनी व २० दिवसांनी विरळणी करावी.

## सोयाबीन

- पावसाळा सुरू होताच कुळवाची पाळी घालावी व काडी कचरा व धसकटे वेचून शेत साफ करावे. शिफारशीप्रमाणे रासायनिक खताची मात्रा देऊन तसेच जीवाणू संवर्धकाची बीज प्रक्रिया करून पिकाच्या अंतरानुसार पेरणी करावी.

**रब्बी ज्वारी**

कुळवाच्या सहाय्याने २ ते ३ पाळ्या द्याव्यात, तिसऱ्या पाळीपूर्वी ७ ते १० टन शेणखत पसरावे.

**फळबाग व्यवस्थापन**

- **डाळिंब –** पावसाचे अतिरिक्त पाणी काढुन द्यावे. पिकसंरक्षणार्थ फळे पोखरणारी अळी, रस शोषणाऱ्या किडी व पानावरील ठिपके नियंत्रण करावे.
- **सिताफळ –** मशागतीची कामे करावीत.
- **बोर –** शिफारशीत खताच्या मात्रा द्याव्यात. नवीन फुटीवर पाने खाणारी अळी/ भुंगेरेचे नियंत्रण करावे.
- **आवळा –** सरंक्षित पाणी द्यावे. पाने खाणारी अळी, फुलकिडे यांचे नियंत्रण करावे.
- **जांभूळ –** बागेची स्वच्छता फळांची काढणी.
- **कागदी लिंबू –** शिफारशीत खतमात्रा (६००:३००:६०० ग्रॅम नत्र:स्फुरद:पालाश प्रति झाड प्रति वर्ष) + १५ किलो शेणखत + १५ किलो निंबोळी पेंड द्यावी. त्यापैकी ४०% नत्र व संपूर्ण स्फुरद, पालाश, शेणखत व निंबोळी पेंड द्यावी. हस्त बहाराच्या नियोजनासाठी जिब्रेलिक ॲसिड ५० पी पी एम ची फवारणी करावी. पिठ्या ढेकूण : क्लोरोपायरीफॉस २० टक्के २० मिली / १० लि. पाण्यातून फवारावे.

**भाजीपाला व्यवस्थापन**

- उन्हाळी हंगामातील वेलवर्गीय भाजीपाला पिकांची वेळेवर काढणी करावी.
- उन्हाळी हंगामातील वांगी, टोमॅटो, मिरची पिकाची तोडणी करावी.
- किड व रोग नियंत्रणाचे उपाय करावे.
- खरीप हंगामातील भाजीपाला पीक लागवडीसाठी शेताची मशागत करावी.
- मशागतीचे वेळी शेणखताचा वापर करावा.
- खरीप हंगामात कांदा, वांगी, टोमॅटो, मिरची, भेंडी, गवार, वेलवर्गीय भाजीपाला, फ्लॉवर, कोबी इ. पिकांची लागवड करावी.
- कांदा, वांगी, मिरची, टोमॅटो, फ्लॉवर व कोबी पिकांच्या रोपवाटीकेसाठी तयार करावे. रोपे गादीवाफ्यावर तयार करावेत.
- कांदा, वांगी, मिरची, टोमॅटो, फ्लॉवर व कोबीचे रोप तयार करण्यासाठी बियांची पेरणी करावी.
- पेरणीआधी बिजप्रक्रिया करावी.

**आले**

- १२० किलो नत्र प्रति हेक्टर यापैकी पहिला हप्ता ६० किलो नत्र लागवडीनंतर एक महिन्यांनी द्यावे.
- जमिनीच्या मगदूराप्रमाणे पाण्याचे नियोजन करावे.

- तणनाशकांचा वापर केला नसल्यास वेळच्या वेळी येणारी तणे खुरपणी करुन काढून टाकावीत.
- जमिनीच्या मगदूराप्रमाणे पाण्याचे नियोजन करावे.
- पावसाचे पाणी साचू देवू नये. पाण्याचा तात्काळ निचरा करावा.

## पशुसंवर्धन

- पावसाळयापुर्वी गोठा दुरुस्त करावा. छताची छिद्रे बंद करावीत. गोठया भोवती पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. गोठयात ओलसरपणा राहणार नाही याची दक्षता घ्यावी.
- गोठे स्वच्छ व कोरडे ठेवावेत. चिखल होवू देवू नये.
- हिरव्या चाऱ्याकरीता ज्वारी, बाजरी, मका यासारखे पिकांना प्राधान्य द्यावे. याचबरोबर बहुवार्षिक पिकांमध्ये यशवंत, मेथीघास यासारखी पिके घ्यावीत.
- साठविलेल्या सुक्या चाऱ्यावर पाणी पडून त्यात बुरशी लागली असेल तर असा चारा जनावरांना देऊ नये तो नष्ट करावा.
- जनावरांचे खाद्य / खाद्यघटक दमट आर्द्रता युक्त वातावरणात साठवू नयेत. त्यामध्ये भिंतीचा / जमिनीचा ओलसरपणा मुरणार नाही याची काळजी घ्यावी.

## अवजारे

### ट्रॅक्टरचलीत योती बहुपिक टोकण यंत्र

- भुईमुग, सुर्यफुल, करडई, सोयाबीन, मका, गहू, वारी हरभरा, तूर इ. पिकांची टोकण पध्दतीने पेरणी करता येते.
- खतांची मात्रा शिफारशीनुसार योग्य खोलीवर आणि बियाण्याच्या बाजूला देता येते.
- शिफारशीप्रमाणे २ ओळींतील आणि दोन रोपांतील योग्य अंतर राखता येते.

**प्रकाशक** : **डॉ. शरद गडाख**
संचालक, विस्तार शिक्षण
**प्रमुख संपादक** : **डॉ. पंडित खर्डे**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
**सहसंपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
सहाय्यक प्राध्यापक, कृषि विस्तार व संवाद विभाग
**डिझाईनर** : **श्री. राजेंद्र जांभळे**
**श्री. सिध्दार्थ साळवे**
मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २३९३/२०२१